
आगच्छत् शिक्षार्थम् । निर्गच्छत सेवार्थम् ।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद

## मोड्यूल क्र. ३

## स्थलांतरित क्षेत्रातील शालेय नेतृत्वाची भूमिका




**प्रस्तावना -**

प्रत्येक मानवाला मेंदू असतो, मेंदू आहे म्हणून प्रत्येक व्यक्ती विचार करू शकते, समजू शकते. शिक्षण हे योग्य दिशेने घेऊन जाण्याचे माध्यम आहे. तशी योग्य दिशा आणि संधी मिळालेल्या व्यक्ती समाजात सन्मानाने जगताना दिसतात. मुलांना सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे ही शिक्षण विभागाची जबाबदारी आहे. समाजातील प्रत्येक मुलाला सन्मानाने जगता येईल याचे प्रयत्न शिक्षण विभाग करत आहे.बालकांची जिज्ञासा पूर्ती शाळेत होईल असे वातावरण शाळेत आवश्यक आहे. बालकाला शाळेत दाखल करून घेणे, योग्य उत्तराने त्यांची जिज्ञासा पूर्ण करणे ही शालेय नेतृत्वाची जबाबदारी आहे.

केंद्र शासनाने २०१० मध्ये बालकांच्या सक्तीच्या व हक्काच्या शिक्षणाचा कायदा(आरटीई) केला आणि त्यानुसार प्रत्येक मुलाला शिक्षणाची संधी मिळायला हवी, या दिशेने अधिक वेगाने प्रयत्न सुरू झाले. प्राथमिक शिक्षणामध्ये शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडणाऱ्या मुलांमध्ये शाळाबाह्य मुलांचे प्रमाण खूप मोठे आहे, त्याला अनेक सामाजिक कारणेही प्रामुख्याने जबाबदार आहेत. व्यवसायाच्या उद्देशाने सतत कुटुंब फिरस्ती करतात,त्यांच्या सोबत लहान मुले असतात, यात ऊस तोडणी कामगारांची मुले, वीटभट्ट्यांवर काम करणाऱ्या पालकांची मुले, दगड फोडणाऱ्या कुटुंबांची मुले, सतत उपजीविकेसाठी व्यवसाय बदलणाऱ्या पालकांची मुले, बांधकामावर सतत फिरस्तीने जाणारी मजूर कुटुंबांची मुले,

परिस्थिती नसल्याने भीक मागून गुजराण करणाऱ्या पालकांची मुले, ही मुले शाळा बाह्य मुलांमध्ये येतात. अशा मुलांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे आणि त्यांच्या जीवनाला एक उत्तम दिशा देण्याचे काम महाराष्ट्रातील अनेक भागातील मुख्याध्यापक आणि शिक्षक करत आहेत. या कामात महाराष्ट्राच्या अनेक वाड्या-वस्त्या डोंगर-दऱ्या येथे जाऊन पालकांना शिक्षणाचे महत्व पटवून देऊन, त्यांना आपल्या मुलांना शाळेत पाठविण्यास राजी करणारे बालरक्षक खऱ्या अर्थाने गौरवास पात्र आहेत. समाजातील तळागाळातील प्रत्येक मूल शाळेत यावे, हा सर्व शैक्षणिक चळवळींचा उद्देश आहे .अजूनही जी मुले शाळा बाह्य आहेत,त्यांना शाळेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट प्राप्त करणे गरजेचे आहे. 2 डिसेंबर 2017 च्या शासन परिपत्रकानुसार सहा ते चौदा.वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाचे नाव शाळेच्या पटावर नोंदविले जाणे, ती मुले नियमित शाळेत येणे आणि त्यांना दर्जेदार शिक्षण मिळणे हा हक्क त्यांना प्राप्त झाला आहे. शासनामार्फत शाळाबाह्य मुलांच्या सर्वेक्षणाची सोय केलेली आहे . मात्र केवळ सर्वेक्षणाने समस्या सुटणार नाही, शालेय नेतृत्वाने मूल टिकवण्यासाठी प्रयत्न केले तर प्रत्येक मूल शाळेत टिकेल प्रत्येक मूल टिकवायचे असेल तर त्याचे शिकणे महत्वाचे आहे . मूल शिकत असेल तर ते शाळेत येतेच,हेच बालरक्षक कार्यक्रमाचे म्हणजेच मुलांना शाळेत आणण्याचे सूत्र आहे. एकही मूल शिक्षणापासून वंचित राहणार नाही, 9 जानेवारी 2017 पासून शाळाबाह्य मुलांना शाळेत दाखल करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी बालरक्षक कार्यक्रम सुरू झाला. पूर्वी सर्व स्वयंसेवी संस्था शाळाबाह्य मुलांसाठी काम करीत आहेत असे दिसत होते , आता मात्र आपल्या कार्यक्षेत्रातील मुल शाळेत दाखल व्हावे म्हणून काम करणाऱ्या शिक्षण व्यवस्थेतील व्यक्तींना बालरक्षक हे संबोधन दिले आहे. या सर्व बालरक्षकांना योग्य प्रशिक्षण देऊन त्यांच्या मदतीने शाळाबाह्य मुलांना मुख्य प्रवाहात आणले आहे. असे असतांनाही शाळाबाह्य मुलांच्या समस्या विभिन्न स्वरूपाच्या आहेत. मुले शाळाबाह्य होण्याची विविध कारणे सांगितली जातात. शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्यांना नियमित शाळेत दाखल करून नियमितपणे शिकवण्यासाठी त्यांना मदतीची गरज आहे . गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून शालेय वयोगटातील 100% मुल शिकावे आणि प्रगत व्हावे यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका महत्वाची असते. शिक्षक हा वर्गातील सर्व मुलांसमोर आदर्श नेता असतो . मुख्याध्यापक हा शाळेचा आदर्श नेता असतो. शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यातील नेतृत्व विकसित करण्याची जबाबदारी क्षेत्रिय अधिकाऱ्यांची आहे. शालेय प्रशासन व व्यवस्थापकीय जबाबदाऱ्या सांभाळून, सतत स्वयंप्रेरित राहून अपेक्षित बदल घडवणारे शालेय नेतृत्व अपेक्षित आहे. त्यासाठी मुलांचे, तसेच समूहाचे मानसशास्त्र समजून घेणे, आवश्यक तंत्र कौशल्य वापरणे, संघ बांधणी करणे व गुणवत्ता संवर्धनासाठी कार्यरत असणे आवश्यक आहे. त्यातून शालेय नेतृत्व विकसित होऊन, येणाऱ्या शालेय समस्या यशस्वीपणे दूर करणे सोपे होईल.




**वर्ष 2018-19 च्या सर्वेक्षणानुसार सरल प्रणालीच्या Out of School (शाळाबाह्य विद्यार्थी) संकलित माहिती नुसार जास्त कालावधीपासून शाळेत अनुपस्थित असलेली महाराष्ट्रातील जिल्हानिहाय विद्यार्थी संख्या खालील प्रमाणे -**

**Equity Dept. OOSC SARAL DATA 2018-19**

| Sr no | Region | District | Absent Since Long Peroid |
|---|---|---|---|
| 1 | Amravati | Akola | 547 |
| | | Amravati | 932 |
| | | Buldana | 1151 |
| | | Washim | 701 |
| | | Yavatmal | 884 |
| **Total** | | | **4215** |
| 2 | Aaurangabad | Aurangabad | 3422 |
| | | Beed | 2518 |
| | | Hingoli | 1047 |
| | | Jalna | 2063 |
| | | Parbhani | 1834 |
| **Total** | | | **10884** |
| 3 | Kolhapur | Kolhapur | 1165 |
| | | Ratnagiri | 650 |
| | | Sangli | 1700 |
| | | Satara | 1100 |
| | | Sindhudurg | 178 |
| **Total** | | | **4793** |
| 4 | Latur | Latur | 1857 |
| | | Nanded | 2928 |
| | | Osmanabad | 835 |
| **Total** | | | **5620** |

**Equity Dept. OOSC SARAL DATA 2018-19**

| Sr no | Region | District | Absent Since Long Peroid |
|---|---|---|---|
| 5 | Mumbai | Mumbai Ii | 3414 |
| | | Mumbai (suburban) | 18984 |
| | | Palghar | 4820 |
| | | Raigarh | 2619 |
| | | Thane | 10808 |
| **Total** | | | **40645** |
| 6 | Nagpur | Bhandara | 167 |
| | | Chandrapur | 519 |
| | | Gadchiroli | 565 |
| | | Gondiya | 295 |
| | | Nagpur | 2337 |
| | | Wardha | 199 |
| **Total** | | | **4082** |
| 7 | Nashik | Dhule | 3584 |
| | | Jalgaon | 4859 |
| | | Nandurbar | 3187 |
| | | Nashik | 6582 |
| **Total** | | | **18212** |
| 8 | Pune | Ahmadnagar | 3642 |
| | | Pune | 8146 |
| | | Solapur | 3392 |
| **Total** | | | **15180** |
| **Grand Total** | | | **103631** |

## मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे -

1.स्थलांतरित क्षेत्रातील शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
2.स्थलांतरित क्षेत्रातील यशस्वी शालेय नेतृत्वाच्या कार्याचा अभ्यास करणे.
3. स्थलांतरित क्षेत्रातयशस्वीरीत्या काम करण्यासाठी शालेय नेतृत्वाचा योग्य दृष्टिकोन विकसित होण्यास मदत करणे.

## स्थलांतरित क्षेत्र संकल्पना - -

स्थलांतरित क्षेत्र म्हणजे असे क्षेत्र जेथे शाळेतील विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालकांसह उपजीविकेसाठी अन्यत्र काही काळासाठी स्थलांतर होते.आपल्या राज्यात स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे कमी अधिक प्रमाण सर्वच जिल्ह्यांमध्ये दिसून येते. पालकांच्या अशा स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात वेळोवेळी खंड पडल्यामुळे असे विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या मागे पडतात. त्यांच्या शिक्षणात वेळोवेळी पडणारी तुट भरून काढण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज असते. स्थलांतरित होणाऱ्या पालकांमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण खूप मोठे आहे.

युनेस्कोच्यासर्वेक्षणानुसार जगभरातील सुमारे 243 दशलक्ष मुले आणि युवक शाळाबाह्य आहेत. प्राथमिक स्तरावरील सुमारे 61 दशलक्ष बालके, उच्च प्राथमिक स्तरावरील 60 दशलक्ष बालके आणि माध्यमिक स्तरावरील 142 दशलक्ष बालके, शाळाबाह्य असण्याची शक्यता वर्तवली आहे . स्थलांतरामुळे मुलांच्या शिक्षणामध्ये अडचणी निर्माण होऊन मुले, शाळाबाह्य होण्याची कारणे प्रामुख्याने दिसून येतात. 20 नोव्हेंबर 1989 रोजी बालहक्क संहितेला मान्यता मिळाली.193 राष्ट्रांसह भारताने देखील बालहक्क संहितेस मान्यता दिली, आणि म्हणूनच 14 ते 20 नोव्हेंबर दरम्यान बालहक्क सप्ताह साजरा केला जातो. मुलांच्या प्रश्नावर खूप चर्चा होतात, काही तोडगे निघतात. पण हे प्रश्न सोडविण्यात अद्याप **पूर्णपणे यश मिळालेले** नाही हे वास्तव आहे. आजवर शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणावर अनेक उपाय योजना सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाच्या माध्यमातून केल्या गेल्या. साखर शाळा, भोंगा शाळा, पाषाण शाळा, खाण शाळा, वीटभट्टी शाळा, महात्मा फुले हमी केंद्र, हंगामी वसतिगृह, निवासी हंगामी वसतिगृह, असा या योजनांचा प्रवास सुरू आहे . बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 अन्वये सहा ते चौदा वयोगटातील सर्व बालकांना शाळेच्या मुख्य प्रवाहात दाखल करणे बंधनकारक असल्याने, शिक्षणाच्या सर्व पर्यायी व्यवस्था बंद करणे क्रमप्राप्त होते. राज्यातील शंभर टक्के मुले, शाळेच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्राथमिक शाळा एक किलोमीटर व उच्च प्राथमिक शाळा तीन किलोमीटर अंतराच्या परिसरात बालकांना उपलब्ध करून देण्यात आली. शासन परिपत्रके, मार्गदर्शक सूचना, विविध कार्यशाळा , प्रशिक्षण यातून शाळाबाह्य मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याचे काम मोठ्या प्रमाणावर होत आहे. म्हणूनच मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होऊन कुटुंबे येतात अशी ठिकाणे निश्चित करून, सातत्याने शिक्षण विभागातील यंत्रणेने, पालकांना भेटून, शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यावे यावर भर देण्यात येत आहे.

पालकांचे स्थलांतर हे अनेक मुलांचे शाळाबाह्य होण्यामागचे महत्त्वाचे कारण असते. स्थलांतरित होणाऱ्या पालकांमुळे शाळेतील मुले देखील पालकांसोबत स्थलांतरित होतात, यामुळे त्यांच्या शिक्षणात खंड पडतो. ही मुले साहजिकच इतर मुलांच्या तुलनेत अभ्यासात मागे पडतात आणि कालांतराने शाळाबाह्य होण्याची दाट शक्यता असते. दिवसेंदिवस निसर्गाचा समतोल बिघडत चालल्याने शेतीवर अवलंबून असलेल्या शेत मजुरांच्या हाताला काम नाही,परिणामी उपजीविकेसाठी त्यांना सतत . स्थलांतर करावे लागते.अर्थार्जनातील अनिश्चिततेमुळे कुटुंब सोबत असते त्यामुळे मुलांच्या शिक्षणात खंड पडतो. ऊस तोडी,वीट भट्टी ही कामे साधारण नोव्हेंबर ते मार्च महिन्यापर्यंत चालतात. या व्यवसायातील कुटुंबांची मुले यादरम्यान शाळेत येत नाहीत.अन्य व्यवसायातील,फिरस्तीवरील कुटुंबातील मुले अनिश्चित काळासाठी सतत गावाबाहेर, परिणामी शाळेबाहेर असतात. शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळाबाह्य याचा अर्थ शाळेत न जाणारी बालके किंवा ज्यांनी शाळेत प्रवेश घेतला नाही किंवा ज्यांनी प्रवेश घेऊन प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले नाही, अशी 6 ते 14 वर्षे वयोगटातील बालके. यात30 दिवसांपेक्षा अधिक काळ सातत्याने अनुपस्थित राहणाऱ्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश होतो. अशा अनियमित मुलांचे दोन प्रकार करता येतील, एक- जे नियमित हजर राहत नाहीतपरंतु शाळेच्या गावात राहतात .दुसरी – जी मुले शाळेत अनियमित असतात आणि रोजंदारीसाठी कुटुंबासह स्थलांतरित होतात.स्थलांतराचे ठिकाण

राज्यात किंवा राज्याबाहेर असू शकते. अशी मुले बरेचदा शाळाबाह्य होऊन शिक्षणापासून दूर जातात.अशा शाळाबाह्य मुलांना शाळेच्या मुख्य प्रवाहात टिकवून ठेवणे हे शाळासाठी आव्हान आहे. शाळाबाह्य मुलांचे शिक्षण हाभेडसावणारा प्रश्न आहे. शिक्षण हक्क कायदा अस्तित्वात आल्यानंतर राज्यात मोठ्या प्रमाणावर शाळाबाह्य मुलेशाळेत दाखल होऊ लागली. त्याचबरोबर गेल्या काही वर्षात राज्यात महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या समता विभागांतर्गत सुरू झालेल्या बालरक्षक कार्यक्रमाने चळवळीचे रूप धारण केले आहे. या चळवळीमुळे अनेक बालके शाळेत प्रवेशित झाली. शाळाबाह्य मुलांना कोणत्या वर्गात दाखल करायचे, त्यांचे शिक्षण कसे पूर्ण करायचे, कोणी, कधी,काय, शिकवायचे या सर्व प्रश्नांना शिक्षण हक्क कायद्याने उत्तरे दिली आहेत. त्यामुळे कलम चार अन्वये वयानुरूप प्रवेश अंतर्गत मुलाचे वय लक्षात घेऊन शाळेत दाखल केले जाते आणि त्याचा अभ्यासक्रम पूर्ण करून घेण्याची सोय केलेली आहे. अशामुलांच्या शिकण्यासाठीचे आणि शिक्षकांनी शिकवण्यासाठीचे संदर्भीय साहित्य उपलब्ध आहे. मात्र तरी देखील अशा स्थलांतरित क्षेत्रात काम करणे शालेय नेतृत्वासाठी एक मोठे आव्हान असते.



**मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यामार्फत शाळा प्रवेशासाठी संपर्क व प्रबोधन**



**परराज्यात ऊस तोडीसाठी पालकांसोबत गेलेल्या विद्यार्थी व पालकांशी मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यामार्फत शाळा प्रवेशासाठी संपर्क व प्रबोधन**



**शाळाबाह्य होऊन परराज्यात गेलेल्या विद्यार्थ्यांना परत शाळेत आणण्याचे मुख्याध्यापकाचे यशस्वी प्रयत्न**

महाराष्ट्रात RTE ACT च्या प्रभावी अंमलबजावणीतून वयानुरुप प्रवेशाबाबत जागरुकता निर्माण करुन स्थलांतरीत विद्यार्थ्यांना वयानुरुप प्रवेश देण्यात आले.

## महाराष्ट्रातील स्थलांतरीत विद्यार्थी तसेच वयानुरुप प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची जिल्हानिहाय सांख्यिकीय माहिती दर्शविणारा तक्ता

**समता विभाग महाराष्ट्र**

Report Date 24Aug2020

वयानुरुप प्रवेशित विद्यार्थी, शाळा, शिक्षक संख्या(सन २०१९-२०२०) आणि स्थलांतरित विद्यार्थी याबाबत माहिती (सन 2020-2021)

| अक्र | जिल्ह्याचे नाव | इयत्ता 1 ली ते 4 थी | | | इयत्ता 5 वी ते 8 वी | | | स्थलांतरीत विद्यार्थी माहिती | | | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शाळा संख्या | शिक्षक संख्या | वयानुरुप प्रवेशित विद्यार्थीसंख्या | शाळा संख्या | शिक्षक संख्या | वयानुरुप प्रवेशित विद्यार्थीसंख्या | इतर जिल्ह्यातून आलेले | इतर जिल्ह्यात स्थलांतरीत | आलेल्या पैकी स्थलांतरित प्रवेशित | |
| 1 | Ahmednagar | 16 | 41 | 65 | 12 | 56 | 36 | 451 | 335 | 335 | 9403693585 |
| 2 | Akola | 63 | 100 | 240 | 41 | 120 | 143 | 142 | 20 | 112 | 8446040953 |
| 3 | Bhandara | 1 | 1 | 2 | 2 | 2 | 2 | 19 | 0 | 19 | 9421715694 |
| 4 | Buldhana | 11 | 11 | 29 | 9 | 27 | 12 | 75 | 350 | 48 | 7507073683 |
| 5 | Chandrapur | 5 | 5 | 9 | 7 | 8 | 8 | 625 | 33 | 434 | 7083443912 |
| 6 | Dhule | 16 | 18 | 78 | 5 | 12 | 15 | 3 | 0 | 3 | |
| 7 | Hingoli | 35 | 48 | 51 | 4 | 4 | 8 | 134 | 30 | 0 | |
| 8 | Amarawati | 62 | 88 | 117 | 38 | 67 | 89 | 118 | 109 | 118 | |
| 9 | Satara | 13 | 16 | 28 | 10 | 11 | 27 | 105 | 31 | 105 | |
| 10 | Mumbai DYDE | 1 | 1 | 1 | 78 | 322 | 665 | 7073 | 18 | 18 | |
| 11 | Aurangabad | 29 | 43 | 71 | 29 | 43 | 117 | 0 | 0 | 0 | |
| 12 | Gadchiroli | 7 | 9 | 16 | 5 | 5 | 12 | 0 | 71 | 67 | 9850265451 |
| 13 | Gondia | 0 | 0 | 0 | 2 | 6 | 2 | 729 | 149 | 250 | 9403205936 |
| 14 | Jalna | 49 | 48 | 97 | 45 | 50 | 273 | 8 | 209 | 209 | 8275334056 |
| 15 | Kolhapur | 7 | 10 | 15 | 5 | 10 | 13 | 895 | 84 | 719 | 9423259439 |
| 16 | Latur | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 961 | 90 | 638 | 7875003925 |
| 17 | M.N.P.DHULE | 1 | 4 | 145 | 1 | 4 | 168 | 0 | 0 | 313 | 9028181992 |
| 18 | MNC akola | 8 | 16 | 22 | 8 | 32 | 17 | 0 | 0 | 0 | 9.18446E+11 |
| 19 | MUMBAI BMC | 90 | 102 | 197 | 67 | 59 | 67 | 25636 | 0 | 15925 | 9892642465 |
| 20 | Nanded | 2 | 4 | 10 | 12 | 35 | 40 | 66 | 73 | 73 | 9623652781 |
| 21 | Nandurbar | 89 | 101 | 97 | 52 | 60 | 99 | 10 | 0 | 10 | 9422737499 |
| 22 | Nashik | 97 | 123 | 298 | 43 | 92 | 199 | 78 | 64 | 78 | 9689402058 |
| 23 | PALGHAR | 11 | 11 | 22 | 9 | 16 | 26 | 1427 | 2117 | 1065 | 7020854385 |
| 24 | Pune | 95 | 132 | 530 | 60 | 98 | 268 | 0 | 0 | 0 | 9921247874 |
| 25 | RAIGAD | 34 | 58 | 114 | 9 | 15 | 24 | 225 | 128 | 57 | 8446883842 |
| 26 | Ratnagiri | 13 | 14 | 28 | 5 | 14 | 5 | 495 | 17 | 495 | 9422966333 |
| 27 | Sangli | 34 | 43 | 63 | 15 | 23 | 28 | 5090 | 1156 | 412 | 8421976939 |
| 28 | Sindhudurg | 16 | 19 | 19 | 10 | 11 | 14 | 2587 | 189 | 2587 | 9764944818 |
| 29 | Wardha | 22 | 33 | 55 | 6 | 14 | 7 | 54 | 24 | 48 | 9834843148 |
| 30 | Washim | 13 | 9 | 17 | 1 | 4 | 3 | 158 | 6 | 122 | 7083815301 |
| 31 | Yavatmal | 10 | 11 | 14 | 2 | 2 | 2 | 53 | 192 | 167 | 9503363098 |
| 32 | Beed | 55 | 59 | 156 | 26 | 58 | 95 | 185 | 18 | 185 | 9404266571 |
| 33 | Nagpur | 28 | 28 | 80 | 12 | 24 | 32 | 121 | 174 | 106 | 9405337258 |
| 34 | Jalgaon | 5 | 5 | 9 | 0 | 0 | 0 | 349 | 271 | 349 | 9923451282 |
| 35 | Parbhani | 108 | 235 | 871 | 51 | 111 | 497 | 587 | 107 | 587 | 9921440423 |
| 36 | Solapur | 98 | 116 | 171 | 40 | 42 | 79 | 49 | 613 | 283 | |
| 37 | Usmanabad | 4 | 7 | 12 | 2 | 8 | 7 | 314 | 21 | 314 | |
| 38 | Thane | 63 | 66 | 509 | 55 | 93 | 324 | 0 | 0 | 0 | |
| | एकूण | 1211 | 1635 | 4258 | 778 | 1558 | 3423 | 48822 | 6699 | 26251 | |

| | |
|---|---|
| इयत्ता 1 ली ते 4 थी वयानुरूप प्रवेशित | 4258 |
| इयत्ता 5 वी ते 8 वी वयानुरूप प्रवेशित | 3423 |
| एकूण सर्व | 7681 |

| | |
|---|---|
| स्थलांतरित पैकी प्रवेश | 26251 |

| | |
|---|---|
| | 12/8 ला अपडेट |
| | 13/8 ला अपडेट |
| | 14/8 अपडेट |
| | 20/8 अपडेट |
| | 23/8 अपडेट |
| | 24/8 अपडेट |

## स्थलांतरीत क्षेत्रातील शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने –

प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या व कुटुंबाच्या उपजीविकेचे साधन प्राप्त होणे ही सर्वात महत्वाची गरज वाटते. स्थलांतरित क्षेत्रात उपजीविकेसाठी सतत फिरस्तीवर असणाऱ्या पालकांच्या मुलांना मात्र सतत स्थलांतरामुळे शिक्षणातील सातत्यात अडथळे येताना दिसतात. स्थलांतरामुळे, पालकांच्या अनास्थेमुळे आणि शिक्षण विषयक अज्ञानामुळे, विविध सुविधांच्या अभावामुळे शालेय नेतृत्व, विद्यार्थी, पालक आणि समाज यांच्यातील शैक्षणिक आंतरक्रिया बऱ्याचदा यशस्वी होत नाही अशा वेळी शालेय नेतृत्वाला अपेक्षित शैक्षणिक यश प्राप्त करणे हे मोठे आव्हान ठरते. स्थलांतरित क्षेत्रात शालेय नेतृत्वापुढे अनेक आव्हाने आहेत. ते पुढील प्रमाणे,

### १. विद्यार्थ्यांशी संबंधित आव्हाने -- .

- स्थलांतरित क्षेत्रातील मुलांची बोली भाषा बऱ्याचदा शालेय नेतृत्वाला अवगत नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांशी आंतरक्रिया करतांना अडथळे येतात. संवाद प्रक्रिया अपयशी ठरल्याने मूल समजून घेण्यासाठी मुलांची भाषा शिकणे हे शालेय नेतृत्वासमोर एक आव्हान असते.
- सततच्या स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती अनियमित असते. त्यांना शाळेत टिकविणे, शाळेची गोडी लावणे हे एक आव्हान असते.
- सततच्या अनुपस्थितीमुळे विषय निहाय अपेक्षित अध्ययन निष्पत्तीची पूर्तता करण्याचे नेतृत्वापुढे आव्हान असते.
- स्थलांतरित क्षेत्रातपुरेशा संधी अभावी आजच्या स्पर्धात्मक युगात आवश्यक असलेले पूरक वातावरण निर्माण करणे व टिकविणे हे शालेय नेतृत्वाला एक आव्हान असते.

### २.शिक्षकाशी संबंधित आव्हाने -- .

- स्थलांतरित क्षेत्रात काम करण्याची बऱ्याच शिक्षकांची मानसिकता नसते. त्यामुळे शालेय नेतृत्वाला आपल्या सहकाऱ्यांचे अपेक्षित सहकार्य मिळत नाही. त्यांची मानसिकता बदलवून त्यांना सतत कार्यप्रवण ठेवण्यासाठी प्रेरणा देणे, हे शालेय नेतृत्वासाठी मोठे आव्हान असते.
- स्थलांतरित क्षेत्रात बहुसंख्य शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत. त्यासाठी सक्ती करणे बऱ्याचदा शक्य होत नाही. दररोज जा ये करतांना ववेळेचे बंधन पाळताना ताणतणावनिर्माण होतो.अनियमित विद्यार्थ्यांच्या पालकभेटी पालकांच्या सोयीच्या वेळेत घेणे आवश्यक असूनही त्यामुळे दुर्लक्ष होते. हेशालेय नेतृत्वापुढेएक आव्हान असते.

### ३. पालकांशी संबंधित आव्हाने --

- स्थानिक पातळीवर पुरेशा प्रमाणात रोजगार उपलब्ध होतनसल्यामुळे,उपजीविकेसाठी पालकांचे आपल्या पाल्यांसह स्थलांतर होत असते. त्यामुळे शाळेत विद्यार्थ्यांची सततची अनुपस्थिती दिसून येते. अशा स्थितीत पालकांचे मुलांच्या शिक्षणाबाबत प्रबोधनकरून मुलांना शाळेत टिकवून ठेवणे हे एक आव्हान असते.
- शिक्षणाबाबतचे अज्ञान व अनास्था यामुळे पालक मुलांच्या घरच्या अभ्यासाकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे अशी मुले अभ्यासात मागे पडतांना दिसतात. त्यांना इतर मुलांच्या सोबत पुढे घेवून जाणे हे शालेय नेतृत्वापुढील एक आव्हान असते.

### ४.समाजाशी संबंधित आव्हाने --

- स्थलांतरित क्षेत्रात वारंवार होणाऱ्या स्थलांतरामुळे समाजाचा सहभाग शालेय उपक्रमात मिळविणे, शाळा विकासासाठी आवश्यक मदत मिळविणे शक्य होत नाही.
- स्थलांतरित क्षेत्रात बऱ्याचदा समाजातील अनिष्ट रूढी, परंपरांचा पगडा, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, तसेच शैक्षणिक उदासीनता, कर्जबाजारीपणा आढळून येतो. अशा ठिकाणी लोकांकडून शाळेला अपेक्षित सहकार्य मिळत नाही. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शाळा व समाज यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक असते. मात्रजेथे शिक्षकांना गावाचा आधार वाटत नाही अशा ठिकाणी शालेय नेतृत्वाला गुणवत्तापूर्ण काम करणे हे एक आव्हान असते.

## स्थलांतरित क्षेत्रातील यशस्वी शालेय नेतृत्वाचा अभ्यास –

शालेय नेतृत्वाला स्थलांतरित क्षेत्रात काम करतांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही आपल्यानेतृत्वाचा यथायोग्य वापर करत काही मुख्याध्यापक व शिक्षक आपली शाळा यशोशिखरावर घेवून जाण्यात यशस्वी होताना दिसून येतात. महाराष्ट्रातील स्थलांतरित क्षेत्रात काम करणाऱ्या अशा यशस्वी शालेय नेतृत्वाची यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत. अनेक अडथळे पार पाडत त्यांनी केलेला प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे. त्यातून प्रेरणा घेवून आपणही आपले नेतृत्व विकसित करून आपली शाळा प्रगतीपथावर घेवून जाण्यास कृतीप्रवण व्हाल ही अपेक्षा आहे

## मुख्याध्यापक यशोगाथा –

**मुख्याध्यापकाचे नाव –श्री जगदीश श्रीकृष्ण कुडे**

**शाळा- जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीराम तांडा,तालुका- मंठा, जिल्हा- जालना**

श्री जगदीश कुडे सर शाळेत रुजू झाले तेव्हा शाळेची पटसंख्या २३ होती.गावाची लोकसंख्या ४५० होती,१००% बंजारा वस्तीचे गाव होते. दसऱ्या नंतर सर्वच मुले पालकांसोबत ऊसतोडीला गेली,सरांनी भरपूर प्रयत्न केले,पालकांशी संवाद साधला-आमची मुले कुणाच्या भरवशावर ठेवणार ? या प्रश्नाने त्यांना निरुत्तर केले.काही मुलांच्या घरचे वृद्ध आजी-आजोबा गावातच होते.मात्र पाण्याचा गंभीर दुष्काळ,आणि मुलांचे पालन पोषण वृद्ध व्यक्तींना शक्य नाही,असे पालकांनी सांगितले.शाळेत गेल्यानंतर शिकण्यासाठी मुलेच नाहीत, याचे सरांना फारवाईट वाटलेआणि या समस्येवर तोडगा काढणे अत्यावश्यक आहे,हे ठरवून आपल्याकामाचेसरांनी  नियोजन केले.




**प्रत्येक पालकाशी विद्यार्थ्यांच्या शाळेतील उपस्थितीसाठी सततचे संपर्क**

सर्वप्रथम कुडे सर गावाची,पालकांची,मुलांची बंजारा भाषा शिकले.त्यातूनच संवाद साधण्याचे कौशल्य सरांनी प्राप्त केले.त्यानंतर परत पालकांशी संवाद साधून मुलांचे स्थलांतर थांबविण्याचा प्रयत्न केला,मात्र यावेळीही मुले पालकांसोबत स्थलांतरीत झालीच. त्यानंतर सरांनी गावात कोण स्थलांतरित झाले नाही,याचे सर्वेक्षण केले,त्यांची घर निहाय यादी बनवलीआणि दररोज दुपारी शालेय पोषण आहार-खिचडीचे ताट प्रत्येक वृद्धाच्या घरात पाठविले.सतत त्यांच्या सोबत संवाद,त्यांच्या प्रकृतीची आस्थेवाईकपणे चौकशी सुरु केली.खूप आजारी असलेल्या वृद्धाना गोळया,मलम पुरविण्याचे काम केले.यातूनच कुडे सरांसोबत गावातल्या वृद्धांचे स्नेह बंध जुळायला सुरुवात झाली.या सर्व गोष्टी ऊसतोडीचे पालक मुलांसह गावात परत येईपर्यंत सुरु होत्या.पालक ज्यावेळी गावात दाखल झालेआणि त्यांना या सर्व बाबींची माहिती मिळाली,तेव्हा त्यांना सरांचा आदर वाटायला लागलाआणि विश्वास वाढला.

**मुख्याध्यापकांच्या पुढाकाराने शाळेत तांड्यावरील महिलांचा मेळावा व उत्सव ज्यात पालकांचा उस्फुर्त सहभाग**

कुडे सरांनी प्रस्तावित स्थलांतरित पालकांची यादी जून महिन्यात तयार केली. जुलै महिन्यात ऊस तोडीस जाणारे पालक,त्यांचे ठेकेदार म्हणजेच मुकादम यांचा मेळावा घेऊन,संपूर्ण प्रक्रिया समजून घेतली,पालक नेमके कोणकोणत्या ठिकाणी उस तोडीस जाणार हा तपशील ,संबंधित पालक,त्यांचे ठेकेदार यांच्या मोबाईल नंबरचे संकलन केले.त्यानंतर २ पालक मेळावे घेऊन शिक्षण महत्वाचे आहे,मुले शिक्षणापासून वंचित राहिली तर मुलांना कोणत्या अडचणी येतील हे सांगितले.स्थलांतराच्या दिवशी सर्व मुलांना आपल्या आजी आजोबांसोबत ठेवावे याचा आग्रह धरला व विद्यार्थ्यांची पूर्ण जबाबदारी घेतली,या प्रयत्नानंतर पाच मुलांना गावात थांबविण्यात सर यशस्वी झाले.त्यानंतर दररोज या मुलांकडे लक्ष देणे,त्यांच्या पालकांशी दिवसातून २ वेळा मोबाईलवर संपर्क करून देणे,त्यांच्या शिकण्यावर लक्ष देणे ,या कामास सरांनी प्राधान्य दिले.त्यानंतर पालक जेव्हा परतले तेव्हा मुलांचे शिकणे, पाहून सरांचे त्यांनी आभार मानले. अशा प्रकारे गावात शिक्षणाबाबत ,शाळेबाबत,सकारात्मक वातावरण निर्माण करण्यास सुरुवात झाली आणि पुढच्या वर्षी शाळेतील १००% विद्यार्थ्यांचे स्थलांतर थांबले.

**मुख्याध्यापक-शिक्षक-पालक यांच्या सतत बैठका व यशस्वी आंतरक्रिया**

केवळ स्थलांतर थांबविण्यात सर यशस्वी झाले नाही,तर आणखी शैक्षणिक बाबीवर सरांनी काम केले,त्यात शाळेत सुरुवातीला सातवी पास केवळ एक मुलगी होती,बाकीच्या मुलींची लगेच लग्न लावले जात असे,नाहीतर मोठी झाली म्हणून शाळेत पाठवले जात नसे.सतत पालक संपर्क,माता मेळावे यातून मुलींच्या शिक्षणाबाबत सरांनी प्रबोधन केले.यावर्षी गावातील ४० माता ,४० मुलींचा सत्कार सरांनी केला,आज गावात १२ वी आधी शाळा सोडलेली एकही मुलगी नाही,किमान १२ वी पास मुली गावात आहेत.

सद्यस्थितीतशाळेतगट अध्ययन, रचनावादी अध्ययन सुरु आहे.मुले शाळेतच जास्त वेळ रमतात. झाडाखालीबरेचदा शिकणे सुरु असते,सर्वात महत्वाचे म्हणजे,पालकांचेही स्थलांतर रोखण्यात कुडे सर यशस्वी झाले,ज्यात स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेऊन पुरुष व स्त्रिया यांच्यासाठी रोजगार साधने गावातच

उपलब्ध झाली,ज्यात शेती औजारे,शेतीकामअनुदान,फळबागा बंधारे,कुक्कुट पालन,शेळीपालन, मोबाईल रिपेरिंग, किराणादुकान, हे व्यवसाय उपलब्ध झाले.६ बचत गट आणि १५० महिला,पुरुष यात सहभागी आहेत.

हे करताना शाळासिद्धी या शाळा स्वयं मूल्यमापनात शाळेची श्रेणी ब वरूनअ पर्यंत नेण्यात सर यशस्वी झाले. आज शाळेची पटसंख्या १४५ असून २५ मुले गावातली,तर १२० मुले जवळपासच्या गावातली आहेत. ही मुले १० गाड्यांमधून शाळेत येतात.दरवर्षी शाळेत वर्षातून २ वेळा गावातील लोकप्रतिनिधी, अंगणवाडीताई,शालेय पोषण आहार मदतनीस,डॉक्टर,परिचारिका,ग्रामसेवक,गाड्यांचे ड्रायव्हर या सर्वांचा सन्मान शाळेतील कार्यक्रमात केला जातो.शालेय व्यवस्थापन समितीचे उत्तम सहकार्य शाळेला असून,शाळेत एक सल्लागार समिती स्थापन केलेली आहे.यात वयस्कर लोकांचा समावेश असून,शालेय व्यवस्थापन समितीमार्फत निर्णय घेण्यापूर्वी या सल्लागार समितीचा सल्ला घेतला जातो.

अशा प्रकारे,स्थलांतरित मुलांच्या शिक्षणातल्या अडचणी सोडविण्यात कुडे सर यशस्वी ठरले. त्यासोबत मुलींचे शिक्षण, ज्ञानरचनावादी शिक्षण प्रक्रिया, शालेय व्यवस्थापन समिती, सल्लागार समिती कामकाज,पालक समाज सहभाग,पालक स्थलांतर थांबवणे, विद्यार्थी पट संख्येत वाढ,उपस्थितीत वाढ, दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षण, यातून शाळेला यश मिळवून देऊन शालेय नेतृत्व सिद्ध करणाऱ्या श्री जगदीश कुडे सर यांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे.



**जर्मनी देशातील शैक्षणिक टीमने जि.प.प्रा.शा,श्रीराम तांडा, ता.मंठा, जि.जालना येथे भेट घेऊन बालरक्षक कामाबाबत मुख्याध्यापकांशी केलेली चर्चा**

## चिंतनात्मक प्रश्न –

१.स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत कुडे सरांना आलेल्या समस्यांची यादी करा.
२.या समस्या दूर करण्यासाठी कुडे सरांनी कोणकोणत्या नेतृत्व कौशल्यांचा वापर केला ?
३.कुडे सरांच्या यशोगाथेबाबत तुमचा थोडक्यात अभिप्राय लिहा.
४.स्थलांतरित क्षेत्रातील शाळांमध्ये कोणत्या नेतृत्व कौशल्यांची गरज आहे असे आपणास वाटते.
५.स्थलांतरित क्षेत्रात काम करण्याची संधी तुम्हाला प्राप्त झाली तर तुमच्या कामाचे स्वरूप कसे असेल, थोडक्यात लिहा.

## विचार करूया,चर्चा करूया -

१. एका गावात दुसऱ्याच्या शेतात जाऊन शेत मजुरी करणारी १२ कुटुंब आहेत,निसर्गाने साथ दिली नाही तर शेत मजुरी साठी काम मिळत नाही, अशा वेळी,हे पालक आपली मुले व कुटुंबासह वर्षातून २ ते ३ वेळा काही महिन्यांसाठी बाजूच्या राज्यात बांधकाम मजुरीसाठी जातात,या काळात मुले पालकांसोबत असल्याने शाळेत उपस्थित नसतात.मुले वर्षातून २ ते ३ महिनेच शाळेत उपस्थित असतात,त्यामुळे त्यांच्या वाचन लेखनात सुद्धा अडचणी दिसून येतात. या शाळेत बदलीने रुजूझाल्यास आपण काय कराल ?
२. एका वस्तीवरील १७ ते २० पालक दरवर्षी दिवाळीनंतर कुटुंब व मुलांसह उस तोडीसाठी ५ ते ६ महिने जिथे काम मिळेल त्या जिल्ह्यात स्थलांतरित होतात.स्थलांतरितहोणाऱ्या मुलांच्या शिक्षणातील सातत्य टिकून राहावे, या दृष्टीने आपण मुख्याध्यापक म्हणून कोणते उपाय योजाल ?

## शाळा विकास आराखडा नियोजन –

आपण कार्यरत असलेल्या शाळेची सद्यस्थिती लक्षात घेवून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एक वर्षाचाशाळा विकास आराखडा तयार करा.

## स्थलांतरित क्षेत्रात काम करीत असताना असेही करता येईल -

महाराष्ट्रात उपजीविकेसाठी पालकांचे मुलांसह स्थलांतर मोठ्या प्रमाणात दिसून येते.त्यातुन शाळांमधील शिक्षक,विद्यार्थी,मुख्याध्यापक यांना अनेक अडचणी येतात,या अडचणींवर मात करण्यासाठी असेही करता येईल.

१.शाळेतील प्रत्येक मुलाची वैयक्तिक,कौटुंबिक माहिती रजिस्टर मध्ये नोंद करावी.
२.स्थलांतर होणारे व स्थलांतर न होणारे विद्यार्थी असे वर्गीकरण करावे.
३. स्थलांतरित होणाऱ्या मुलांच्या स्थलांतरा बाबत शालेय व्यवस्थापन समितीस अवगत करावे.
४.स्थलांतर रोखण्यासाठी गृह भेटींचे आयोजन करावे.
५. गृहभेटी नंतर माता पालक मेळावे,पालक मेळावे यांचे महिन्यात किमान २ वेळा आयोजन करावे.
६.विद्यार्थ्यांची स्थानिक बोलीभाषा प्रत्येक शिक्षक व मुख्याध्यापक यांनी अवगत करून, त्या भाषेत ग्रामस्थांशी, पालकांशी संवाद साधावा.
७. मनोरंजक, रचनावादी, गटात,साहित्याचा वापर करून अध्ययन प्रक्रिया यशस्वी करावी.
८.स्पर्धा परीक्षा,इतर कला कौशल्य,यात प्राविण्य संपादन करणाऱ्या मुलांचा,पालकांचा सत्कार करावा.
९. शालेय व्यवस्थापन समिती,सामाजिक संस्था,पालक,नागरिक,गावातील शासकीय प्रमुख, कर्मचारी,यांचे,संबंध सहकार्याचे असावेत.
१०.प्रत्येक विद्यार्थ्याला प्रत्येक विषयातील किमान क्षमता प्राप्त व्हाव्यात,यासाठी मूलनिहाय गुणवत्ता सुधार कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी शाळेने करावी.



**माता पालक मेळावे**



**प्रत्यक्ष गृहभेटी**

स्थलांतरित क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजना-

१.२६ ऑक्टोबर २०१८ च्या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई परिपत्रकाअन्वये स्थलांतरित विद्यार्थ्यांना शिक्षण हमी कार्ड उपलब्ध करून दिले जाते,ज्यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा हक्क अबाधित राहतो.
२.स्थलांतरित बालकांच्या शोधासाठी नियमितपणे सर्वेक्षणाची शासन स्तरावरून सोय केलेली आहे.
३.सरल प्रणालीत शाळाबाह्य मुलांची संकेत स्थळावर drop box मध्ये माहिती उपलब्ध करून दिली जाते.
४.स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फतगाव पातळीवर हंगामी वसतिगृह योजनेअंतर्गत सोय करण्यात येते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने स्थलांतरित क्षेत्रातील शिक्षणाच्या संदर्भाने केलेला विचार -**

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 चा आढावा घेतला असता, स्थलांतरीत क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने शालेय शिक्षणाच्या महत्वाच्या उद्दिष्टांपैकी खालील महत्वाची उद्दिष्टे दिलेली आहेत.

**1.सर्व स्तरावरील शिक्षणामध्ये सर्वांना वैश्विक प्रवेश व त्यांना शिक्षणप्रवाहात टिकवून ठेवणे -**

सन 2030 पर्यंत 3-18 वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीच्या दर्जेदार शालेय शिक्षणास प्रवेश मिळवून शिक्षणामध्ये त्यांचा सहभाग घेणे.

- सन 2030 पर्यंत विविध उपाययोजनांच्या माध्यमातून शालेयपूर्व काळापासून ते माध्यमिक शिक्षणापर्यंत 100 % ग्रॉस एनरोलमेंट साध्य करावयाचा आहे.
- शाळेतील मुलांच्या भरतीच्या संख्येत वाढ करणे, ज्या ठिकाणी शालेय सेवा आजवर देता आलेली नाही किंवा कमी प्रमाणात उपलब्ध आहे अशा ठिकाणी नवीन सुविधा विकसित करणे, आणि सर्व विद्यार्थ्यांसाठी विशेषतः मुलींसाठी, संपूर्ण सुरक्षेची हमी देऊन शाळेत ये-जा करण्यासाठी दळणवळण सेवा व वसतिगृहाची सेवा आवश्यकेनुसार उपलब्ध करुन देणे, अशा उपाययोजनांमधून शालेय प्रवेशाची दरी कमी करण्याचा मानस आहे.
- शाळेत प्रवेश घेतलेल्या मुलांच्या दैनंदिन उपस्थितीचा व अध्ययनाच्या निष्पत्तीचा आढावा घेणे, तसेच शिक्षक, समाजसेवक व स्वयंसेवक यांच्यामार्फत शाळेतून गळती होणाऱ्या व शाळेत न येणाऱ्या मुलांच्या संख्येवर पाळत ठेवणे आणि शाळेबाहेरील पौगंडावस्थेतील मुलांसाठी कार्यक्रम राबवून मुलांचा शालेय शिक्षणातील सहभाग व अध्ययन वाढविले जाईल. औपचारिक व अनौपचारिक शैक्षणिक माध्यमांमधून अध्ययनाचे वेगवेगळे मार्ग उपलब्ध करुन दिले जातील आणि सोबतच खुले शालेय शिक्षण (ओपन स्कूलिंग) व दूरवरुन शालेय शिक्षण (डिस्टन्स स्कूलिंग) व तंत्रज्ञान वापरण्याची साधने यांचे सबलीकरण करण्यात येईल.
- जर आरोग्यविषयक कारणास्तव विद्यार्थी शाळेत उपस्थित राहू शकत नसतील तर त्यांनी त्वरित शाळेत रुजू होण्यास आवश्यक असलेल्या उपाययोजना करण्यात येतील. त्यामध्ये शाळेत आरोग्यसेवकांची नेमणूक करणे, तसेच याविषयी विद्यार्थी, पालक व व्यापक प्रमाणावर समाजामध्ये जनजागृती करणे आणि त्यांना योग्य आरोग्य सेवांशी संपर्क करुन देणे या बाबींचा समावेश होतो.

**2.शालेय शिक्षणातील सर्व स्तरावरील सर्व विद्यार्थ्यांना व्यासंगी, उत्स्फूर्त, उच्चशिक्षित, व्यावसायिकदृष्ट्या प्रशिक्षित शिक्षकांकडून शिकविले जाईल, याची दक्षता घेणे -**

- सर्व शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती सर्वसमावेशक शिक्षक आवश्यकता नियोजन यावर आधारित कडक व नियमबध्द प्रक्रियेतून केली जाईल.
- अशा निवडीदरम्यान उमेदवारांमध्ये वैविध्य राखण्यासोबत स्थानिक शिक्षकांना व स्थानिक भाषेवर प्रभुत्व असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.
- शिक्षकांच्या कार्याचे सुलभीकरण होण्यास्तव अपेक्षित विद्यार्थी - शिक्षक गुणोत्तरासोबतच पुरेशा पायाभूत सुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) व अध्ययन साहित्य पुरविले जाईल. सर्व विद्यार्थी योग्य अध्ययन करीत आहेत की नाही याबाबत शिक्षकांना खातरजमा करता यावी म्हणून सर्व स्तरांवर दोषनिवारक कार्यक्रम (रिमेडिअल प्रोग्रॅम्स) निर्माण करण्यात येतील.

**3.सर्व मुलांना अध्ययनाच्या व उत्कर्षाच्या समान संधी मिळाव्यात आणि सन 2030 पर्यंत सर्व लिंगाच्या व सामाजिक वर्गवारीच्या सहभागामध्ये व अध्ययनाच्या निष्पत्तीमध्ये समानता असावी या उद्देशाने एक सर्व समावेशक व न्याय शिक्षण प्रणाली अस्तित्वात आणणे -**

- कमी प्रतिनिधित्व असणाऱ्या गटांमधील किंवा वंचित मुलांच्या बाबतीत प्रारंभिक बाल्यावस्था शिक्षण, पायाभूत साक्षरता व अंकज्ञान, शालेय उपलब्धता, शालेय प्रवेश व उपस्थिती यांच्याशी निगडित असलेल्या धोरणातील कृतींकडे विशेष लक्ष व साहाय्य पुरविले जाईल.
- देशभरातून वंचित प्रदेशांमध्ये विशेष शिक्षण झोन्स उभारण्यात येतील. त्यासाठी केंद्र शासन आर्थिक साहाय्य करेल.
- वंचित गटांमधील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या, साधने व सुविधा विकसित केल्या जातील.
- शहरी भागातील गरीब कुटुंबांमधील विद्यार्थ्यांना योग्य जीवनमान मिळावे, यासाठी त्यांना शिक्षण प्रदान करणे, दिव्यांग तसेच तृतीयपंथी मुलांना शिक्षण प्रदान करणे, यासोबतच परिसरातील शाळांमधील पायाभूत स्तरापासून ते इयत्ता बारावीपर्यंतच्या मुख्य प्रवाहातील मुलांवर निरंतर व आणखी उमेदीने लक्ष केंद्रित करणे, या बाबी सदर धोरणाची ठळक उद्दिष्टे आहेत.

स्थलांतरित **होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये (NEP-2020) निर्देशित केलेल्या शिफारसी:**

- प्रत्येक मुल शाळेत प्रवेश घेईल व नियमित पणे शाळेत उपस्थित राहील, याची खात्री करणे हे शालेय शिक्षणाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.
- सन 2017-18 मध्ये राष्ट्रीय न्यादर्श सर्वेक्षण संघटन (National Sample Survey Organization) च्या 75 व्या सर्वेक्षणानुसार 6 ते 17 वर्षे वयोगटातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या 3.22 कोटी आहे. या विद्यार्थ्यांना लवकर शालेय प्रवाहात आणणे ही देशाची सर्वोच्च प्राथमिकता आहे.
- मुलींसाठी शाळेपर्यंत पोहोचण्याची सुरक्षित व्यवस्था किंवा वसतीगृहांची व्यवस्था केली जाईल. नागरी संस्थाच्या सहकार्याने पर्यायी आणि नाविण्यपूर्ण शिक्षण केंद्रे सुरु केले जातील. ज्याद्वारे स्थलांतरित मजूरांची मुले आणि वेगवेगळ्या कारणांमुळे शाळा सोडलेली मुले यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात पुन्हा आणता येईल.

- भारतात ज्या मुलांना नियमित शाळेमध्ये शिक्षण घेणे शक्य नाही अशा मुलांसाठी राष्ट्रीय मुक्त शिक्षण शाळा (National Institute of Open Schooling ) आणि राज्यांच्या मुक्त शाळा याद्वारे सुरु असलेल्या मुक्त आणि दूरस्थ शिक्षण कार्यक्रमांचे विस्तारीकरण आणि दृढीकरण केले जाईल.
- समग्र शिक्षा अभियान आणि शिक्षणाचा अधिकार अधिनियम याच्या अंमलबजावणीतून आपल्या देशात प्रशिक्षित आणि पात्र समाजिक कार्यकर्ते शासनाने तयार केलेल्या साहित्य व तंत्राद्वारे शाळांशी जोडले जातील. शाळेतील भौतिक सुविधांची उपलब्धता आणि विद्यार्थ्यांचा शालेय सहभाग वाढल्यानंतर विद्यार्थी टिकण्यासाठी गुणवत्ता हा महत्वपूर्ण घटक असेल. त्यासाठी गळती जास्त असलेल्या क्षेत्रामध्ये स्थानिक भाषेचे ज्ञान असलेल्या शिक्षकाची नियुक्ती केली जाईल.
- सामाजिक व आर्थिक दृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे अनेक मार्ग उपलब्ध होतील.
- नियमित शिक्षण शक्य नसलेल्या मुलांसाठी राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था व राज्य मुक्त शाळा याद्वारे कार्यक्रमाचे विस्तारीकरण केले जाईल. राज्य मुक्त शिक्षण संस्थांची स्थापना व सक्षमीकरण करुन शैक्षणिक कार्यक्रम राज्य शासनामार्फत स्थानिक भाषांमध्ये चालविले जातील.
- विद्यार्थ्यांना अध्ययनात मदत करण्यासाठी माजी विद्यार्थी आणि स्वयंसेवकांची मदत घेतली जाईल.

**" स्थलांतरित क्षेत्रातील नेतृत्वाची भूमिका" या मोड्यूलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टीकोनातून उपयुक्तता -**

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय दि.22 जून, 2015 शालेय शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई या कार्यक्रमांर्गत महाराष्ट्रातील शालेय शिक्षणात अत्यंत महत्वपूर्ण विषयांवर काम करण्यात आले ज्यात, शाळाबाह्य विद्यार्थी शाळेत आणणे, वयानुरुप प्रवेश, बालरक्षक चळवळ यातून स्थलांतरामुळे शिक्षणात येणाऱ्या अडथळ्यांवर मात करण्यासाठी राज्य स्तरावरुन समता विभागाअंतर्गत शिक्षण विभागातील अधिकारी ते शिक्षक सर्वांना प्रशिक्षित करण्यात आले, या सर्व अभ्यासातूनच मोड्यूलची निर्मिती झाली ज्याचा नक्कीच फायदा शैक्षणिक नेतृत्व विकासाच्या वाटचालीत होईल.

- शिक्षण हक्क कायदा 2009 ची यशस्वी अंमलबजावणी
- प्रत्येक विद्यार्थ्याचा शिक्षणाचा हक्क बाधित होऊ न देता यशस्वी शिक्षण प्रक्रिया
- स्थलांतरासंदर्भात येणाऱ्या समस्यांचे पृथक्करण, वर्गीकरण, विश्लेषण, करुन समस्येची सोडवूणक
- Get Outside of your comfort zone - यानुसार काम करण्याची प्रेरणा
- बहुकार्यप्रवणतेत वाढ, कमी वेळात अधिकाधिक काम करण्याची क्षमता
- संघभावनेत वाढ, त्यातूनच समस्या निराकरण होण्यास मदत
  एकूणच प्रत्येक शाळेत मूल टिकेल व शिकेल आणि त्यातूनच गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रक्रियेची अंमलबजावणी होईल.

**NEP-2020 च्या अनुषंगाने मोड्यूल संदर्भात गुणवत्तापूर्ण शिक्षण :**

उपेक्षित, वंचित विद्यार्थ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. शिक्षण हे समता सुनिश्चित करण्याचे एक उत्तम माध्यम आहे, ज्याद्वारे समाजात समानता, समावेशकता आणि सामाजिक, आर्थिक गतिशीलता मिळू शकते. अशा गटांतील सर्व मुलांसाठी पूर्वापार अडथळे असले तरी या गटातील विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येऊन प्रगती करतील. या दृष्टीने NEP-2020 मधील भाग 1 शालेय शिक्षण यात करण्यात आला आहे.

- बाल्यावस्थापूर्व निगा आणि शिक्षण - शिकण्याचा पाया
- पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान अध्ययनाची एक आवश्यक पूर्वअट
- गळतीचे प्रमाण कमी करून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण
- अभ्यासक्रम आणि शाळांमधील बालअध्यापनशास्त्र यांचे 5+3+3+4 या आकृतीबंधात पुनर्गठन
- शिक्षकांची नियुक्ती, संस्कृती, व्यावयायिक विकास प्रगती
- समन्यायी समावेशीत शिक्षण
- शाळा समूह या माध्यमातून कुशल संसाधन आणि प्रभावी प्रशासन
- शाळा शिक्षणासाठी मानक निर्धारण आणि मूल्यांकन
  - अशाप्रकारे गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रत्येक बालकास प्राप्त व्हावे यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये वरील मुद्यांनुरून विचार करण्यात आला, ज्यातून विद्यार्थी व शिक्षण यंत्रणा निश्चितच अधिक सक्षम होईल

**समारोप –**

शालेय शिक्षणात काम करताना परिस्थिती कितीही विपरीत व प्रतिकूल असली तरी त्यावर मात करण्याचे सामर्थ्य सक्षम नेतृत्वाकडे असते.विद्यार्थ्यांना शाळेत टिकवून,शिकण्याची गोडी लावण्यासाठी शालेय नेता स्वतःचे शालेय नेतृत्व विकसित करतो. त्यात स्वयं विकास,संघ बांधणी,भागीदारी,शालेय प्रशासन या भूमिका व जबाबदाऱ्यासमर्थपणे पेलतो. अध्ययन अध्यापन प्रक्रियेतून अपेक्षित परिणाम साधण्यासाठी सहकार्यांना प्रोत्साहन देतो. आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःच्या माध्यमातून शालेय नेतृत्वाचा आदर्श निर्माण करतो.महाराष्ट्रात स्थलांतरित क्षेत्रात यशस्वी कार्य करणारे श्री जगदीश कुडे यांच्यासारखेअनेक मुख्याध्यापक व शिक्षक कार्यरत आहेत.त्यांच्या कार्याच्या अभ्यासातून, स्थलांतरित होणाऱ्या बालकांच्या शिक्षणासाठी यशस्वी कार्य सतत होत राहावे,हीच अपेक्षा.

## संदर्भ साहित्य –


१. शासन निर्णय प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र .२२ जून २०१५ ,१६ सप्टेंबर २०१६, ,९ जानेवारी २०१७.

२. वयानुरूप शिक्षण प्रवेश, शिक्षण हक्क कायदा २००९ कलम चार.

३. निश्चयाचे बळ,मार्च २०११ महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई

४. जीवन शिक्षण अंक जुलै २०१८, डिसेंबर २०१८,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.

५. शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य, जानेवारी २०१८ संचालक महाराष्ट्र विद्या प्राधिकरण पुणे.

६. निष्ठा, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार, डिसेंबर २०१९, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.

७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.

website -

1. http://mahatribal.gov.in/ALL%20SCHEMES.pdf
2. http://mr.vikaspedia.in/learning-resources
3. http://samata.shiksha/mr/
4. https://www.ssampsp.org
5. https://www.youtube.com/watch?v=LxN0OV5M6Hw&t=1s
6. https://www.youtube.com/watch?v=lOjjLlFDtMs
7. https://www.youtube.com/watch?v=5TotOii3MbY
8. https://www.youtube.com/watch?v=DCIVX4_5BvM
9. https://www.youtube.com/watch?v=_Y56Lb-3HK0
10. https://www.youtube.com/watch?v=iZYMhMQDBlI

डॉ.ज्योती कुलकर्णी,
समन्वयक
मिपा (SLA),
औरंगाबाद,महाराष्ट्र